# मूल्यवर्धन



विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

'मूल्यवर्धन' हा शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील आणि कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून तयार केलेला कार्यक्रम आहे.

'मूल्यवर्धन' अंतर्गत विद्यार्थांना संविधानातील मूल्ये व त्यासंबंधित कौशल्ये विकसित करण्यासाठी नियोजित अशा संधी सातत्याने मिळतात.

## मूल्यवर्धनची वैशिष्ट्ये






- राज्यघटनेतील मूल्ये शालेय शिक्षणात इयत्ता पहिलीपासून वयोगटानुसार रुजविण्याचा प्रयत्न
- ज्ञानरचनावादावर आधारित बालस्नेही, आनंददायी, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीचा वापर
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा,२००५ तसेच शिक्षणहक्क कायदा, २००९ आणि प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ यावर आधारित
- मूल्ये 'शिकविली' जात नाहीत, तर ती 'नियोजित उपक्रमांतून आनंददायी पद्धतीने रुजविली' जातात
- मूल्यशिक्षणासाठी शाळांमध्ये सध्या होत असलेल्या प्रयत्नांना पूरक कार्यक्रम
- विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक या सर्व हितसंबंधितांशी संवाद साधणारा 'समग्र शाळा दृष्टिकोन' (Whole-School Approach) अंगिकारून मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला जातो
- शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम, उपलब्ध असणारी साधनसामग्री यानुसार आवश्यक वाटतील असे बदल करून राबवता येणारा लवचिक कार्यक्रम

## मूल्यवर्धनमुळे होणारे फायदे

- विद्यार्थ्यांची स्वतःविषयीची जाणीव अधिक समृद्ध होईल. त्यामुळे ते स्वतंत्रपणे विचार करू शकतील आणि जबाबदारीने निर्णय घेऊ शकतील तसेच स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवू शकतील.
- विद्यार्थी समाजातील विविधता ओळखू शकतील आणि तिचा आदर करू शकतील.
- विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये वाढू लागतील.
- शिक्षक आणि विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षक, विद्यार्थी आणि पालक, विद्यार्थी आणि विद्यार्थी यांचे संबंध दृढ होतील.
- शिक्षण हक्क कायद्यामधील बालस्नेही, विद्यार्थीकेंद्रित अध्यापनाविषयीच्या अनेक अपेक्षा पूर्ण होण्याकडे शाळेची वाटचाल सुकरपणे होईल.
- विद्यार्थी कुटुंबातील, शाळेतील व परिसरातील व्यक्तींच्या मदतीसाठी व कल्याणासाठी योगदान देतील.





## मूल्यवर्धनचा पूर्वेतिहास

सामाजिक, शैक्षणिक आणि आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते श्री. शांतिलाल मुथ्था यांनी २००९ मध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाची संकल्पना मांडली. त्यानुसार बीड जिल्हा परिषदेच्या परवानगीने आष्टी व पाटोदा तालुक्यांतील जिल्हा परिषदेच्या ५०० प्राथमिक शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. एनसीईआरटी कडून या कार्यक्रमाचे मूल्यमापन झाले. तसेच इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठ या आंतरराष्ट्रीय संस्थेकडून तसेच अमेरिकेतील ओरेगॉन विद्यापीठातील ब्रायन फ्ले सारख्या तज्ज्ञाकडून या कार्यक्रमाची फलनिष्पत्ती तपासण्यात आली. त्यामधून मुलांमध्ये सकारात्मक बदल घडल्याचे निष्पन्न झाले. सलग सात वर्षे हा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये राबवत असताना मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व शिक्षणाधिकारी या सर्वांकडून मिळालेल्या सूचना यांचा महत्त्वाचा वाटा कार्यकम विकसनामध्ये आहे.

या सर्व प्रायोगिक अंमलबजावणीच्या अनुभवाच्या आधारे, राष्ट्रीय व राज्य शैक्षणिक आराखडे व शिक्षण हक्क कायदा यांना पूरक असा मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आराखडा २०१५ मध्ये शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने तयार केला.








## महाराष्ट्र शासनाने घेतलेला निर्णय

मूल्यवर्धन कार्यक्रम सतत सात वर्षे यशस्वीपणे राबविल्याचे चांगले परिणाम दिसून आले. शासनाने या कार्यक्रमाची पाहणी करून हा कार्यक्रम महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये राबविण्याचा मानस व्यक्त केला. शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने (एसएमएफ) महाराष्ट्र शासनाला संपूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. अंमलबजावणीची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्र शासनाने मूल्यवर्धन आराखडा, शिक्षक उपक्रम पुस्तिका आणि विद्यार्थी उपक्रम पुस्तिका यांचे वेगवेगळ्या तज्ज्ञांकडून परीक्षण करून घेतले. त्यानुसार एसएमएफ ने त्यात आवश्यक ते बदल केले. त्यानंतर 'मूल्यवर्धन' हा 'महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम' म्हणून जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. सुरुवातीला प्रत्येक जिल्ह्याच्या एका केंद्रात याची अंमलबजावणी सुरु करून क्रमाक्रमाने त्याची व्याप्ती वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन व एसएमएफ यांच्यामध्ये नोव्हेंबर, २०१५ मध्ये करार करण्यात आला.

## करारानंतर मूल्यवर्धन कार्यक्रमाची वाटचाल





प्रत्येक जिल्ह्यातील एका केंद्रामधील सर्व शाळांमध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी करण्यात आली. त्यासाठी एसएमएफने प्रत्येक केंद्रातील केंद्रप्रमुख आणि एक शिक्षक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन पुणे येथे केले. त्यानंतरचे पहिले तीन महिने या शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या वर्गामध्ये मूल्यवर्धनच्या उपक्रमांचे आयोजन केले. प्रशिक्षणामध्ये व उपक्रम करून घेण्यामध्ये या शिक्षकांना आनंद व समाधान वाटले आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने आणि आनंदाने प्रतिसाद दिला. याच शिक्षकांना एसएमएफ ने पुन्हा शिक्षक-प्रशिक्षक (Trainers) होण्यासाठी प्रशिक्षण दिले. त्यांना त्यांच्या केंद्रातील शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रम आयोजित करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी सज्ज केले.

सन २०१६-१७ या वर्षात प्रायोगिक केंद्रातील सर्व शिक्षकांनी त्यांच्या शाळांमध्ये मूल्यवर्धनची अंमलबजावणी यशस्वीपणे केली. या वर्षात विद्या प्राधिकरण व एसएमएफ यांनी संयुक्तपणे दोन वेळा तज्ज्ञ व्यक्तींना सर्व जिल्ह्यांमध्ये परीक्षणासाठी पाठविले. परीक्षकांना विद्यार्थी व शिक्षकांमध्ये सकारात्मक बदल घडू लागल्याचे दिसून आले. या भेटींचे अहवालही विद्या प्राधिकरणाने प्रसिद्ध केले आहेत.

श्री. शांतिलाल मुथ्था यांनी स्वतः सर्व जिल्ह्यांच्या मूल्यवर्धन चालू असलेल्या सर्व केंद्रामध्ये भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पालक व शिक्षणाधिकारी यांच्याबरोबर प्रत्येक केंद्रात बैठकांचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यामधून विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये सकारात्मक प्रतिसाद आणि उत्साह मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले. याचा एकत्रित परिणाम म्हणून प्रत्येक ठिकाणी मूल्यवर्धनची व्याप्ती वाढविण्याची व्यापक मागणी समोर आली.

## मूल्यवर्धन कार्यक्रम विस्तार : शासनाचा निर्णय

गेल्या वर्षभरामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, व केंद्रिय मानवसंसाधन विकासमंत्री या सर्वांनी मूल्यवर्धनच्या आढावा बैठका घेतल्या. मा. शिक्षणमंत्री यांनी मूल्यवर्धन शाळेला स्वतंत्रपणे भेट दिली.

दिनांक ०७ नोव्हेंबर २०१६ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी मूल्यवर्धनची राज्यस्तरीय आढावा बैठक घेऊन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबद्दल समाधान व्यक्त केले आणि आगामी दोन वर्षात मूल्यवर्धन महाराष्ट्राच्या सर्व शाळांमध्ये सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला.



## सन २०१७-१८ मधील मूल्यवर्धन कार्यक्रमाची व्याप्ती

महाराष्ट्र शासनाने सन २०१७-१८ मध्ये मूल्यवर्धन कार्यक्रम ३५ जिल्ह्यांतील १०७ तालुक्यांमधील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये विस्तारित करण्याचा निर्णय घेतला. या कार्यक्रमाची व्याप्ती एका दृष्टीक्षेपात पुढीलप्रमाणे आहे.

| जिल्हे | तालुके | केंद्रे | शाळा | शिक्षक | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | १०७ | १६१८ | १८,५७२ | ५०,८८७ | ९,३३,६७१ |

## मूल्यवर्धन अंमलबजावणीची कार्यपद्धती (२०१७-१८)






- ज्या तालुक्यांत मूल्यवर्धन कार्यक्रम सुरु होणार आहे, त्या तालुक्यांमध्ये एसएमएफ च्या मुख्य कार्यालयातून तालुका समन्वयकाची (Taluka Coordinator) निवड केली गेली आहे.
- विद्या प्राधिकरणाने आखून दिलेल्या प्रक्रियेप्रमाणे प्रत्येक केंद्रातून केंद्रप्रमुख व दोन निवडक शिक्षक असे प्रशिक्षण पथक (Training Team) तयार केले जाणार आहे. त्यांना केंद्रातील शिक्षक प्रशिक्षकाच्या जबाबदाऱ्या देण्यात येणार असून, ही जबाबदारी पूर्ण करणाऱ्यांना 'मूल्यवर्धन प्रेरक' असे संबोधण्यात येणार आहे.
- निवड झालेल्या मूल्यवर्धन प्रेरकांसाठी तालुका पातळीवर एसएमएफ च्या प्रशिक्षकांकडून चार दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये मूल्यवर्धन उपक्रम वर्गात आयोजित करण्याचे कौशल्य विकसित होईल.
- हे प्रशिक्षण घेतल्यानंतर पहिले किमान २-३ महिने मूल्यवर्धन उपक्रम त्यांच्या त्यांच्या शाळेमध्ये वर्गात आयोजित करावयाचे आहेत.
- त्यानंतर या सर्व मूल्यवर्धन प्रेरकांसाठी त्यांनी इतर शिक्षकांचे प्रशिक्षण कसे करायचे यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा एसएमएफ कार्यालयातील प्रशिक्षकांमार्फत तालुका पातळीवर घेतली जाणार आहे.
- हे प्रशिक्षण घेतल्यानंतर मूल्यवर्धन प्रेरकांनी त्यांच्या केंद्रामधील सर्व शिक्षकांसाठी दोन-तीन टप्प्यांमध्ये चार दिवसांची 'मूल्यवर्धन शिक्षक कार्यशाळा' घेऊन इतर शिक्षकांना प्रशिक्षित करावयाचे आहे.
- जे शिक्षक या कार्यशाळेमधून प्रशिक्षण घेतील, ते नंतर आपल्या शाळेमध्ये मूल्यवर्धन उपक्रम इयत्ता पहिली ते चौथी इयत्तांपैकी आपल्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करतील.

## अत्याधुनिक तंत्राचा वापर

शिक्षकांची विखुरलेली मोठी संख्या व मूल्यवर्धनची वाढती व्याप्ती लक्षात घेता प्रशिक्षणासाठी दृक-श्राव्य, ई-लर्निंग इत्यादी तंत्रांचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला याचा फायदा घेऊन प्रशिक्षित होता येईल. तसेच मूल्यवर्धनच्या अंमलबजावणीमध्ये वेगवेगळे अहवाल पाठविण्यासाठीही नव्या तंत्राचा वापर करण्यात येत आहे.





"मूल्यवर्धित शिक्षणावर भर देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मला असं वाटतं की आता हा कार्यक्रम महाराष्ट्रातल्या सगळ्या शाळांना उपलब्ध होणं हा एक ambitious प्रयोग आहे. चला, या प्रयोगाला आपण पूर्ण ताकदीने मदत करूया, महाराष्ट्रातील शिक्षण मूल्यवर्धित करूया."

**श्री. विनोद तावडे,** शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य



**दिनांक : ११ जून २०१७**

"मूल्यवर्धन हा मूल्य शिक्षणाचा भारतातील सर्वात मोठा प्रयोग असून येत्या दोन वर्षात मूल्यवर्धन महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये यशस्वी करून दाखवू व संपूर्ण भारतामध्ये आम्ही मूल्यवर्धन कार्यक्रम घेऊन जाऊ शकू."

**दिनांक : २१ जून २०१७**

"मूल्यवर्धन महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरु असून त्यामुळे सकारात्मक बदल झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मोठे परिवर्तन होत असल्याचे दिसत आहे."

**श्री. देवेंद्रजी फडणवीस,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य


**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण**

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे, ४११ ०३०

फोन नं.: ०२० २४४७ ८१२२ | dir.mscert@gmail.com

www.mscert.org.in

**शांतिलाल मुथ्था फाउंडेशन**

८ वा मजला, मुथ्था चेंबर्स -२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१

फोन नं.: ०२० ६६०५ ०००० | info@mutthafoundation.org

www.mutthafoundation.org